नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ११३ Issue - 113 | वार बुधवार दि. १० सप्टेंबर २०२५ Blow- Wednesday Date 10 September 2025 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणूकीत विजयी

## इंडिया आघाडीचे उमेदवार आणि माजी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी ३०० मते मिळाली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : महाराष्ट्राचे विद्यमान राज्यपाल आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) उमेदवार सी.पी. राधाकृष्णन हे उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणूकीमध्ये विजयी झाले आहेत.

उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी आज संसदेत मतदान झाले. एकूण ९८ टक्के मतदान झाले असून यामध्ये एनडीएचे उमेदवार सीपी राधाकृष्णन यांना एकूण ७५२ मतांपैकी पहिल्या पसंतीची ४५२ मते मिळाली आहेत तर इंडिया आघाडीचे उमेदवार आणि माजी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी ३०० मते मिळाली आहेत.



उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक प्रक्रिया आज सकाळी १० वाजता संसद भवनात सुरू झाली. देशभरातील खासदारांनी आपले मतदान केले, आणि सायंकाळी ५ वाजता मतदान प्रक्रिया संपल्यानंतर सायंकाळी ६ वाजता मतमोजणीला सुरुवात झाली. काटेकोर सुरक्षा व्यवस्था आणि पारदर्शक पद्धतीने पार पडलेल्या या प्रक्रियेचा निकाल सायंकाळी ७:३० वाजता राज्यसभेचे महासचिव आणि निवडणूक रिटर्निंग ऑफिसर पी.सी. मोदी यांनी जाहीर केला. निवडणूक आयोगाने ही प्रक्रिया शांततेत आणि पूर्णपणे नियमांचे पालन करून पार पडल्याचे स्पष्ट केले.

सी.पी. राधाकृष्णन हे भारतीय जनता पक्षाचे (भाजप) ज्येष्ठ नेते असून, त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीत अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. सध्या ते महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी झारखंड येथेही राज्यपाल पदाची जबाबदारी सांभाळली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही या विजयानंतर सीपी राधाकृष्णन यांचे अभिनंदन केले आहे. तसेच, त्यांनी आपलं आयुष्य सर्वसामान्य, गरीबांसाठी व समाजासाठी खर्ची केल्याचंही मोदींनी म्हटलं आहे. तर, भाजप खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणूक निकालावर प्रतिक्रिया देताना काँग्रेसला टोला लगावला. राहुल गांधींनी आत्मपरीक्षण करावे, असे म्हणत त्यांनी बॅलेट पेपरचा दाखला दिला. खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर विश्वास दाखवला आहे, ही निवडणूक ईव्हीएमवर नाही बॅलेट पेपरवर झालेली आहे, त्यामुळे राहुल गांधींनी आत्मपरिक्षण करावं, असेही गोपछडे यांनी म्हटलं.

सीपी राधाकृष्णन हे दीर्घकाळापासून भाजपचे सदस्य आहेत. लहान वयातच ते भारतीय जनसंघाचे सदस्य झाले होते. यावेळी त्यांचे वय १७.५ वर्ष होते. सीपी राधाकृष्णन हे देखील दोन वेळा लोकसभेचे सदस्य राहिले आहेत. १९९८ आणि १९९९ च्या सार्वत्रिक निवडणुका त्यांनी भाजपच्या तिकिटावर जिंकल्या. पण २००४, २०१२ आणि २०१९ मध्ये त्यांचा पराभव झाला. तामिळनाडूच्या कोईम्बतूर लोकसभा मतदारसंघातून ते दोनदा खासदार म्हणून निवडून आले होते. तामिळनाडूमध्ये भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष राहिले आहेत. सीपी राधाकृष्णन यांना खेळाची खूप आवड आहे. त्यांना टेबल टेनिस, क्रिकेट आणि व्हॉलिबॉल या खेळांची आवड आहे. महाविद्यालयीन जीवनात त्यांचं टेबल टेनिस आणि धावण्यात विशेष प्राविण्य होतं. १९७८ मध्ये त्यांनी मदुराई विद्यापीठामधून बीबीएचं शिक्षण घेतलं होतं. तसेच राज्यशास्त्रात त्यांनी पीएचडी देखील केली आहे. देशाच्या राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांनी अनेक राज्यांमध्ये नवीन राज्यपालांच्या नियुक्त्या केल्या आहेत. यामध्ये महाराष्ट्राचे नवीन राज्यपाल म्हणूम सीपी राधाकृष्णन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर राज्यातील भाजपचे ज्येष्ठ नेते हरिभाऊ बागडे यांची राजस्थानच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

# लडाखच्या सियाचिनमध्ये हिमस्खलन, तीन जवान शहीद



लेह : जगातील सर्वात उंच युद्धक्षेत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सियाचिन ग्लेशियरमधून हृदयद्रावक बातमी समोर येत आहे. याठिकाणी मोठ्या प्रमाणावर हिमस्खलन झाले आहे. भारतीय सैन्याचे जवान या हिमस्खलनाच्या कचाट्यात सापडले आहे. या दुर्घटनेत तिघा जवानांनी शौर्याने लढत प्राण गमावले आहे.

हिमस्खलनाची माहिती मिळताच सैन्य अधिकाऱ्यांनी तात्काळ बचाव पथके घटनास्थळी रवाना केली. हवामानातील विषमता आणि कठीण परिस्थिती असूनही रेस्क्यू टीमने धाडस दाखवत मदतकार्य सुरू केले. हिमवादळे, कडाक्याची थंडी आणि उंच प्रदेश या सगळ्या अडचणींमध्येही भारतीय जवान या भागात तैनात राहून देशाच्या सीमांचे रक्षण करत असतात.

सियाचिन ग्लेशियर हा लडाखमधील काराकोरम पर्वतरांगेच्या पूर्वेकडील भागात येतो. समुद्रसपाटीपासून सुमारे १८ हजार फूट उंचीवर हा प्रदेश आहे. काही भाग २४ हजार फूट उंचीपर्यंत पोहोचतो. तसेच यासाठीही महत्वाचा प्रदेश ठरतो की भारत-पाकिस्तान आणि चीनच्या त्रिकोणी सीमेवर वसलेला प्रदेश आहे. एवढ्या उंच ठिकाणी प्रखर थंडी, बर्फाच्छादित प्रदेश आणि विरळ हवा यामुळे जवानांसाठी दैनंदिन जीवन अवघड ठरत आहे.

# दिल्ली ते काठमांडू विमानसेवा बंद, सरकारकडून भारतीयांसाठी ॲडव्हाईजरी जारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

काठमांडू : भारताचा शेजारी देश असलेल्या नेपाळमध्ये मोठी राजकीय उलाथापालथ झाली असून पंतप्रधान केपी ओली शर्मा यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. विशेष म्हणजे मंत्रिमंडळातील काही मंत्र्यांना चक्का लाथाबुक्क्यांनी मारहाण झाल्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. नेपाळमधील या घटनेनं जगभरातील राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं असून भारतानेही या घटनांची दखल घेत नेपाळमधील भारतीयांना व नेपाळमध्ये जाण्याचं नियोजन करणाऱ्यांसाठी ॲडव्हाईजरी जारी केली आहे. त्यानुसार, नेपाळमधील परिस्थिती पूर्वपदावर येईपर्यंत कुणीही नेपाळचा प्रवास करू नये, असे भारत सरकारच्या विदेश मंत्रालयाने म्हटले आहे. तर, दिल्ली ते





काठमांडू विमानसेवाही बंद करण्यात आली आहे.

नेपाळ मधील सध्याची परिस्थिती विचारात घेता, भारतीय नागरिकांनी परिस्थिती पूर्ववत होईपर्यंत प्रवास करणे टाळावे. सध्या नेपाळमध्ये असलेल्या भारतीय नागरिकांनी सध्याच्या वास्तव्याच्या ठिकाणी सुरक्षित आश्रय घ्यावा. रस्त्यावर किंवा बाहेर पडणे टाळावे. सर्वोतपरी काळजी घ्यावी, असे आवाहन भारताकडून करण्यात आले आहे. नेपाळ प्रशासन तसेच काठमांडू मधील भारतीय दूतावासाच्या मार्फत प्राप्त होणाऱ्या स्थानिक सुरक्षा नियमांचे तंतोतंत पालन करावे. कोणत्याही मदतीसाठी, कृपया खालील हेल्पलाईन नंबरच्या माध्यमातून काठमांडू स्थित भारतीय दूतावास सोबत संपर्क साधावा, असेही आवाहन भारतीय नागरिकांना भारतीय दुतावासाकडून करण्यात आले आहे. तसेच, व्हॉट्सअप कॉलसाठी दोन संपर्क क्रमांक देण्यात आले आहेत.

१. +९७७ - ९८० ८६० २८८१ (व्हॉट्सअप कॉल साठी सुद्धा)

२. +९७७ - ९८१ ०३२ ६१३४ ( व्हॉट्सअप कॉल साठी सुद्धा )

# राज्यात ‘मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते’ योजना, कटकट मिटणार, शेतापर्यंत रस्ता होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील शेतीमधील वाहतुकीची समस्या सोडवण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते' असे नवीन योजनेची घोषणा करण्यात आली आहे. त्याबरोबरच विधानसभा आमदारांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला असून या रस्त्यांसाठी सीएसआर फंडातून निधी उपलब्ध करण्यात यावा तसेच यासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष तयार करण्यात येणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीत हे निर्णय घेण्यात आले. बैठकीच्या अध्यक्षस्थानी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे (उहरपवीरीहशज्ञहरी लुरुपर्ज्ञीश्रश) होते. यावेळी ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे, रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, वित्त व नियोजन राज्यमंत्री आशीष जयस्वाल यांच्यासह समितीतील खासदार आणि आमदार उपस्थित होते. महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले, सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या आयुष्यात क्रांती घडविणारी ही योजना आहे. शेतकऱ्याच्या शेतापर्यंत रस्ते,वीज आणि पाणी पोहचले तर त्याला आपला माल बाजारपेठेत घेऊन जाणे शक्य होणार आहे. यासाठी सरकारने प्राधान्याने या योजनेवर भर दिला असून १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत या योजनेच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने कार्यकाही होणे आवश्यक आहे. यासाठी प्रथमतः सीमांकन करणे आवश्यक असून सर्व आमदारांनी याबाबत अतिदक्ष राहून सर्व पाणंद रस्ते नकाशावर आणावेत. हा नकाशा पुढील महिनाभरात गावामध्ये प्रसिद्ध करण्यात यावा. विविध १३ योजनांच्या माध्यमातून सध्या या रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.



समितीची स्थापना: या योजनेच्या कामकाजासाठी आमदारांच्या अध्यक्षतेखाली मतदारसंघनिहाय एक समिती स्थापन केली जाईल. समितीत प्रांताधिकारी सदस्य सचिव तर तहसीलदार, गटविकास अधिकारी, भूमि अभिलेख अधिकारी, तालुका कृषी अधिकारी आणि वन विभागाचे अधिकारी काम करतील. सुरुवातीच्या सहा महिन्यांत रस्त्यांचे सीमांकन करणे आवश्यक आहे.

त्यानंतर पुढील सहा महिन्यांत गावाचा नकाशा तयार करून तो गावात प्रसिद्ध करावा. रस्त्यांच्या दर्जावर भर देत चांगली माती आणि मुरुम वापरण्याची सूचना केली.

या योजनेसाठी मनरेगा आणि इतर १३ विविध योजनांतून निधी उपलब्ध केला जाईल. सीएसआर निधीचा उपयोग करण्यासाठी प्रांताधिकारी यांचे विशेष खाते तयार केले जाईल. एक किलोमीटरपेक्षा जास्त लांबीच्या रस्त्यांना व्हीआर नंबर देण्यासाठी प्रस्ताव पाठवला जाईल.

**मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम ॲक्शन मोडवर...!**

**येत्या आठवड्यात सर्वच तालुका निहाय बैठका घेण्यात येणार**

# घरकुलाचे काम कमी असणाऱ्या मोहोळ तालुक्यातील पाच ग्रामपंचायत अधिकारी यांना कारवाई करण्याची बजावली नोटीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी

प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेंतर्गत आज मोहोळ पंचायत समितीमध्ये आढावा बैठकीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी घरकुलाचे काम कमी असणाऱ्या व हलगर्जीपणा करणाऱ्या २० ग्रामपंचायत चा आढावा घेतला तर ५ ग्रामपंचायत अधिकारी यांच्या वर शिस्तभंग कारवाई करण्याबाबत नोटीस बजावण्यात आली आहे.दरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम हे घरकुल कामामध्ये ॲक्शन मोडमवर आले आहेत.



मोहोळ पंचायत समितीच्या सभागृहामध्ये आज मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी आज प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेंतर्गत ग्रामपंचायत अधिकारी, विस्तार अधिकारी व शाखा अभियंता यांची आढावा बैठकी घेऊन अडीअडचणीबाबत मार्गदर्शन केले.यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक अमोल जाधव, गट विकास अधिकारी विवेक जमदाडे, सहाय्यक गट विकास अधिकारी व्ही.आर. देशमुख, विस्तार अधिकारी नागसेन कांबळे, सचिन कदम, एस.आर.ठक्का आदी उपस्थित होते.

प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेंतर्गत ज्या तालुक्यात काम कमी आहे असे तालुका व ग्रामपंचायत यांची मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांनी जिल्हा व तालुका स्तरावर आढावा घेऊन बैठक घेऊन घरकुल कामास गती दिली आहे.यापूर्वी घरकुलाचे काम कमी असणाऱ्या २ ग्रामपंचायत अधिकारी यांच्या कारवाई करण्यात आली आहे.आज मोहोळ पंचायत समिती येथे आढावा बैठक घेऊन मोहोळ तालुक्यात घरकुलाचे काम कमी असलेल्या २० ग्रामसेवकांना धारेवर धरले.अजून पंधरा दिवसांनी घरकुल योजनेची पुन्हा बैठक घेण्यात येणार असून कामात सुधार न करणाऱ्या ग्रामसेवकांना कारवाईचा इशारा दिला आहे आणि लाभार्थ्यास कुठल्याही स्तरावर त्रास व अडवणूक होणार नाही याची काळजी घेण्याच्या सक्त सूचनाही दिल्या आहेत.येत्या आठवड्यात सर्वच तालुका निहाय बैठका घेण्यात येणार आहेत.

मोहोळ तालुक्यातील पेनूर व पाटकुल या दोन ग्रामपंचायतीना मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक अमोल जाधव, यांनी प्रत्यक्ष भेट देऊन घरकुल कामाच्या प्रगतीची पाहणी केली.

## या २० ग्रामपंचायतचे उद्दिष्ट जास्त शिल्लक

**प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत टप्पा २ मधील सन २०२४- २५ मध्ये असमाधानकारक कामकाजबाबत मोहोळ तालुक्यातील शेटफळ, पोपळी, कोळेगाव, कुरुल,पाटकुल, वाफळे, नरखेड, स.वरवडे, देगाव (वा.), साळवेश्वर, आष्टी, पेनूर, औंढी वाळूज, आष्टी, बाभुळगाव, म.चौधरी, गोटेवाडी, कोरवली, अंकोली या ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी यांना कामात सुधार करण्याच्या सूचना दिल्या.घरकुलचे २० टक्केच काम सुरू असल्याने व्यक्त केली नाराजी व्यक्त केली.यापूर्वी जिल्ह्याला मीटिंग घेत दोन ग्रामसेवक निलंबित करून काही ग्रामसेवकांच्या वेतन वाढ थांबवल्या आहेत.स्वतः लाभार्थ्यांची भेट घेत त्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या तसेच जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकारी यांनाही यातून लाभार्थी भेटी घेण्याचा संदेश दिला.या महत्वकांक्षी योजनेत सोलापूर जिल्हा मागे राहणार नाही यासाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अशाप्रकारे बाह्या सरसवल्या आहेत.**

## संपादकीय....

# शेतकरी हिताचा निर्णय

राज्यातील शेतीमधील वाहतुकीची समस्या सोडवण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते' असे नवीन योजनेची घोषणा करण्यात आली आहे. त्याबरोबरच विधानसभा आमदारांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला असून या रस्त्यांसाठी सीएसआर फंडातून निधी उपलब्ध करण्यात यावा तसेच यासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष तयार करण्यात येणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नुकतीच दिली. सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीत हे निर्णय घेण्यात आले.सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या आयुष्यात क्रांती घडविणारी ही योजना आहे. शेतकऱ्याच्या शेतापर्यंत रस्ते,वीज आणि पाणी पोहचले तर त्याला आपला माल बाजारपेठेत घेऊन जाणे शक्य होणार आहे. यासाठी सरकारने प्राधान्याने या योजनेवर भर दिला असून १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर या कालावधीत या योजनेच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने कार्यकाही होणे आवश्यक आहे. यासाठी प्रथमतः सीमांकन करणे आवश्यक असून सर्व आमदारांनी याबाबत अतिदक्ष राहून सर्व पाणंद रस्ते नकाशावर आणावेत. हा नकाशा पुढील महिनाभरात गावामध्ये प्रसिद्ध करण्यात यावा. विविध १३ योजनांच्या माध्यमातून सध्या या रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. या योजनेच्या कामकाजासाठी आमदारांच्या अध्यक्षतेखाली मतदारसंघनिहाय एक समिती स्थापन केली जाईल. समितीत प्रांताधिकारी सदस्य सचिव तर तहसीलदार, गटविकास अधिकारी, भूमि अभिलेख अधिकारी, तालुका कृषी अधिकारी आणि वन विभागाचे अधिकारी काम करतील. सुरुवातीच्या सहा महिन्यांत रस्त्यांचे सीमांकन करणे आवश्यक आहे. त्यानंतर पुढील सहा महिन्यांत गावाचा नकाशा तयार करून तो गावात प्रसिद्ध करावा. रस्त्यांच्या दर्जावर भर देत चांगली माती आणि मुरुम वापरण्याची सूचना केली. या योजनेसाठी मनरेगा आणि इतर १३ विविध योजनांतून निधी उपलब्ध केला जाईल. सीएसआर निधीचा उपयोग करण्यासाठी प्रांताधिकारी यांचे विशेष खाते तयार केले जाईल.

# भारताचे नवनिर्वाचित उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी केले अभिनंदन

नवी दिल्ली : महाराष्ट्राचे विद्यमान राज्यपाल आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) उमेदवार सी.पी. राधाकृष्णन भारताच्या उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणूकीत विजयी झाले आहेत. या विजयाबद्दल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राधाकृष्णन यांचे हृदयपूर्वक अभिनंदन केले. ते म्हणाले, मा. सी.पी. राधाकृष्णन यांना उपराष्ट्रपती म्हणून निवड झाल्याबद्दल मनःपूर्वक शुभेच्छा. आपले जीवन सेवा, समर्पण आणि राष्ट्रहिताप्रती निष्ठेचे प्रतीक आहे. शिक्षण, सामाजिक उत्थान आणि सुशासनातील आपले योगदान प्रेरणादायी आहे. आपल्या अनुभव आणि दूरदृष्टीमुळे भारत नव्या उंची गाठेल आणि जागतिक स्तरावर सशक्त स्थान प्राप्त करेल. महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून आपले मार्गदर्शन अमूल्य आहे. आपली ही नवीन यात्रा यशस्वी आणि लोककल्याणकारी ठरो, अशी मी प्रार्थना करतो.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही राधाकृष्णन यांचे अभिनंदन करताना म्हटले, महामहीम राज्यपाल श्री. सी.पी. राधाकृष्णन यांची उपराष्ट्रपतीपदी निवड झाल्याबद्दल हार्दिक शुभेच्छा! त्यांची महाराष्ट्रातील राज्यपालपदाची कारकीर्द छोटी असली तरी त्यांनी राज्यपाल पदाचा गौरव वाढवला. समर्पण आणि विनम्र नेतृत्वाचा हा सन्मान आहे. विकासाची गंगा सामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि 'रालोआ'च्या नेतृत्वाने सुयोग्य उमेदवार देऊन देशासमोर उदाहरण ठेवले आहे.



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देशाचे नवनिर्वाचित उपराष्ट्रपती श्री. सी. पी. राधाकृष्णन यांचे उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीतील विजयाबद्दल मनापासून अभिनंदन केले आहे. श्री. राधाकृष्णन यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून केलेल्या उत्कृष्ट कार्याचा उल्लेख करत, अजित पवार यांनी त्यांच्या अनुभवाचा देशाच्या लोकशाही आणि संविधानिक मूल्यांच्या सक्षमीकरणासाठी निश्चितच लाभ होईल, असा विश्वास व्यक्त केला.

हा विजय राष्ट्रीय लोकशाही आघाडी (छऊ) च्या एकजुटीचा आणि केंद्र सरकारवरील जनतेच्या विश्वासाचा प्रतीक असल्याचे सांगत, अजित पवार यांनी श्री. राधाकृष्णन यांच्या विजयाने महाराष्ट्रातील जनतेचा आनंद द्विगुणित झाल्याचे नमूद केले. हा महाराष्ट्रासाठी अभिमानाचा क्षण आहे. श्री. राधाकृष्णन यांचे नेतृत्व संसदीय परंपरा बळकट करण्यास आणि भारतीय संविधानाच्या मूल्यांचे संवर्धन करण्यास महत्त्वपूर्ण योगदान देईल, असे अजित पवार यांनी म्हटले आहे.

# अपघातग्रस्तांना तात्काळ मदत करणाऱ्यास २५ हजारांचे बक्षिस; शासनाची राह-वीर योजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर दि.०९(जिमाका): - केंद्र शासनाच्या रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालयाने मोटार वाहनांच्या जीवघेण्या अपघातात अपघातग्रस्त झालेल्या व्यक्तीस तात्काळ मदत करणाऱ्या आणि अपघातग्रस्तांना अपघाताच्या गोल्डन अव्हरमध्ये हॉस्पिटल्स ट्रॉमा केअर सेंटरमध्ये वैद्यकीय उपचारासाठी घेऊन जाणाऱ्या व्यक्तीस राह-वीर म्हणून पुरस्कार देण्याची घोषणा जाहीर केलेली आहे. रस्त्यावरील मोटार अपघातातील अपघातग्रस्तांना आपत्कालीन परिस्थितीत मदत करणाऱ्याकरिता सामान्य जनतेस प्रवृत्त करणे व निष्पाप जीव वाचविण्यासाठी इतरांना प्रेरणा देणे प्रेरित करण्याच्या उद्देशाने राह-वीर योजना सुरु करण्यात आलेली आहे. या योजनेद्वारे राह-वीर यास २५००० रुपये इतकी पुरस्कार रक्कम रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालयाने नवी दिल्ली यांनी निश्चीत केलेली आहे. जिल्हा रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आलेली असून. या योजनेबाबत रोजी जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक घेण्यात आली. जिल्हास्तरीय समितीकडून निवडण्यात आलेल्या राह-वीर व्यक्तीची निवड करण्यात येणार आहे. या समितीकडून मंजूर झालेले प्रस्ताव परिवहन आयुक्त, मुंबई यांचे कार्यालयाकडे पाठविण्यात येणार आहेत. अशी माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी सोलापूर यांनी दिली आहे.

# मधुरा मकरंद देशपांडे यांना इंग्लिश मीडियम स्कूल असोशियनचा इन्स्पायर टीचर अवॉर्ड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी

दत्तवाड हॅपी इंग्लिश स्कूल




शिरोळच्या प्रिन्सिपल मधुरा मकरंद देशपांडे यांना इंग्लिश मीडियम स्कूल असोशियनचा इन्स्पायर टीचर अवॉर्ड कोल्हापूर येथे पालकमंत्री प्रकाश आंबिटकर, शिक्षण अधिकारी मीना शेंडकर, सुवर्णा सावंत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

कोल्हापूर येथील हॉटेल सयाजी मध्ये झालेल्या शानदार कार्यक्रमात शिक्षण क्षेत्रात त्या करत असलेल्या कार्याची दखल घेऊन मधुरा देशपांडे यांना फेटा मानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

शिक्षक दिनानिमित्त इंग्लिश मीडियम स्कूल असोसिएशन (इम्सा) कोल्हापूर यांच्यामार्फत पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम पार पडला पुरस्कार वितरणाचे हे चौथे वर्ष असून जिल्ह्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या प्रिन्सिपल व शिक्षकांचा सन्मान करण्यात आला

यावेळी असोसिएशनचे राज्यसचिव प्रभाकर हेरवाडे प्रदेशाध्यक्ष गणेश नायकुडे अमर सरनाईक नितीन पाटील जिल्हाध्यक्ष के डी पाटील संस्थापक अध्यक्ष महेश पोळ सचिन नाईक यांच्यासह जिल्ह्यातील इंग्लिश मीडियम स्कूलचे शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मंडल अधिकारी कार्यालय आणि तलाठी कार्यालय बांधण्यासाठी निधी मिळावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला: सर्वसामान्य नागरिकांसह शेतकर्यांची कामे सुरळीत व्हावी व कर्मचार्यांनाही कामे करताना अडचण येऊ नये यासाठी सांगोला विधान सभा मतदार संघातील गावासाठी ७ मंडल अधिकारी कार्यालय आणि ३२ तलाठी कार्यालय बांधण्यासाठी महसूल मंत्री महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निधीची मागणी केली असल्याची माहिती आम.भाई डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी दिली.

आमदार भाई डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी काल मंगळवार दिनांक ९ सप्टेंबर रोजी मुंबई येथे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली. रस्ते,पाणी, वीज या समस्यांबरोबरच दुर्लक्षित असलेल्या विषयांकडे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी बारीक लक्ष दिले असून यावेळी त्यांनी दुर्लक्षित असलेल्या सांगोला तालुक्यातील तलाठी कार्यालय व मंडळ कार्यालय बांधण्यासाठी निधीची मागणी केली.

**आमदार भाई डॉ.बाबासाहेब देशमुख यांची महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे मागणी**

सांगोला तालुक्यातील काही गावांमध्ये आजही तलाठी व मंडळ कार्यालयांसाठी स्वताच्या मालकीची इमारत नाही. आतापर्यंत ही कार्यालये गावातील ग्रामपंचायत, सामाजिक सभागृह, मंदिर किंवा गावातील खाजगी इमारतीत सुरु होती. महसूल विभागाची कामेही आता ऑनलाईन प्रणालीतून होऊ लागली आहेत. स्वताची इमारत नसल्याने ऑनलाईन कामे करतांना अनेक तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागत होते. परिणामी महसूल कर्मचार्यांसोबत शेतकर्यांची गैरसोय होते. त्यामुळे सुसज्ज तलाठी कार्यालय आणि मंडळ कार्यालये असावी अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांकडून अनेकवेळा आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या कडे केली जात होती. या मागणीचा गांभीर्याने विचार करुन आमदार





भाई डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी नवीन तलाठी व मंडळ कार्यालय बांधकामासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निधीची मागणी केली आहे. नूतन मंडळ कार्यालय आणि तलाठी कार्यालय इमारतींच्या बांधकाम झाल्यास सांगोला तालुक्यातील शेतकरी व सर्वसामान्य जनतेची गैरसोय दूर होणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी केलेल्या मागणीची दखल घेत सकारात्मक प्रतिसाद दिला असून लवकरात लवकर निधीची तरतूद करणार असल्याचे आश्वासन दिले.

# जि. प. प्रशाला ईटकुर शाळेमध्ये नवीन शिक्षकांचे आगमन; ढोल ताशाच्या गजरात स्वागत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद प्रशाला ईटकुर शाळेमध्ये नवीन बदली होऊन आलेल्या सर्व शिक्षकांचे शाळा व्यवस्थापन समिती व गावकऱ्यांच्या वतीने तसेच जिल्हा परिषद प्रशाले च्या वतीने वाद्याच्या गजरात स्वागत करण्यात आले.

१) श्री मुल्ला अब्दुल तोफिक २) श्री ताकमोगे दिगंबर भीमराव ३) श्री चव्हाण विनोद राजेंद्र ४) श्री बाबर राहुल नवनाथ ५) श्री गावखरे काकासाहेब बाबुराव ६) श्री देशमुख महेश श्रीराम राव ७) श्री शिंदे अनिल अभिमान.

या सर्व गुरुजनांचे गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करून स्वागत करण्यात



आले.यावेळी या कार्यक्रमाचे नियोजन शालेय शिक्षण समिती, शाळेचे मुख्याध्यापक यांनी केले होते.

या कार्यक्रमासाठी गावातील तरुण वर्ग, प्रतिष्ठित मंडळी, सर्व शिक्षक स्टाफ, व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात शिक्षक दिन व शिक्षक सन्मान सोहळा उत्साहात संपन्न**

**प्राचार्य डॉ. जे. जी. जाधव यांचे प्रतिपादन**

# शिक्षक समाजपरिवर्तन व राष्ट्रघडणीचे कार्य करणारा शिल्पकार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर - रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात शिक्षक दिनानिमित्त भव्य शिक्षक सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना, स्टाफ वेल्फेअर कमिटी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र व समारंभ समितीच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव तथा सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. जे. जी. जाधव उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बाळासाहेब बळवंत हे होते.





या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. डॉ. दत्तात्रेय चौधरी यांनी करून दिला. महाविद्यालयातील सीनियर व ज्युनियर विभाग तसेच व्यवसाय अभ्यासक्रम विभागातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर सेवकांचा श्रीफळ, गुलाबपुष्प व पेन देऊन सन्मान करण्यात आला.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना प्राचार्य डॉ. जे. जी.जाधव म्हणाले, शिक्षक हा समाजाचा महत्त्वाचा घटक आहे. तो केवळ शिक्षण देणारा व्यक्ती नसून समाजपरिवर्तन व राष्ट्रघडणीचे कार्य करणारा शिल्पकार आहे. एक शाळा सुरू केली की शंभर तुरुंग बंद करावे लागतात, या उक्तीप्रमाणे शिक्षक समाजाचे भविष्य घडवतो. यावेळी त्यांनी शासनाच्या शिक्षण क्षेत्राकडे असलेल्या दुर्लक्षावरही टीका केली. कंत्राटीकरण, अपुरे वेतन, भरती प्रक्रियेतील विलंब, तसेच अशैक्षणिक कामांचा बोजा या गोष्टींमुळे शिक्षक प्रभावीपणे कार्य करू शकत नाहीत, असे मत त्यांनी व्यक्त केले. शिक्षण व आरोग्य ही राष्ट्राच्या प्रगतीची मूलभूत क्षेत्रे असून शासनाने या क्षेत्रांकडे प्राधान्याने लक्ष द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

अध्यक्षीय भाषणात डॉ. बाळासाहेब बळवंत हे म्हणाले की, शिक्षक हा समाजाचा दुवा आहे. मात्र सध्याच्या परिस्थितीत त्याची उपेक्षा होत असल्याचे दिसते. शैक्षणिक क्षेत्रात नवनवीन आव्हाने उभी राहत आहेत. जागतिक पातळीवरील बदल विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी शिक्षकाने सतत अद्ययावत राहणे गरजेचे आहे. परंतु शासन शिक्षण क्षेत्राकडे गांभीर्याने पाहत नसल्याने शिक्षक व विद्यार्थ्यांसमोर अनेक अडचणी उभ्या राहत आहेत. ही बाब समाजहिताच्या दृष्टीने धोकादायक आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. अमर कांबळे व प्रा. रोहिणी बावचकर यांनी केले. आभारप्रदर्शन प्रा. डॉ. उमेश साळुंखे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अभिजीत जाधव, अमोल माने, सुरेश मोहिते, तानाजी खरात आदी शिक्षकेतर सेवकांनी विशेष प्रयत्न केले. या सन्मान सोहळ्यात उपप्राचार्य डॉ. भगवान नाईक नवरे, उपप्राचार्य डॉ. राजेश कवडे, उपप्राचार्य व अधिष्ठाता डॉ. महेंद्र गजधने, अधिष्ठाता डॉ. समाधान माने, अधिष्ठाता डॉ. अनिल चोपडे आदी मान्यवर शिक्षक व शिक्षकेतर सेवकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांचे मनोगत व विचार शिक्षकांच्या सामाजिक बांधिलकीस अधोरेखित करणारे ठरले. शिक्षक दिनाचे औचित्य साधून झालेला हा कार्यक्रम केवळ सन्मान सोहळाच नव्हता, तर शिक्षण व्यवस्थेतील प्रश्नांना अधोरेखित करणारा व समाजाच्या चिंतनास प्रवृत्त करणारा सोहळा ठरला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# दिव्यांग प्रमाणे इतरही निराधार लाभार्थी अनुदान वाढवा

## श्रावणबाळ माता-पिता सेवा सामाजिक संघटनेची मुख्यमंत्र्याकडे मागणी; पंढरपूर तहसीलदारांना दिले निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी

दिव्यांग प्रमाणे इतरांनाही निरधार लाभार्थींची अनुदान वाढवा श्रावणबाळ माता-पिता सेवा सामाजिक संघटनेचे मुख्यमंत्री कडे नावे हजारो निराध-ार यांच्या उपस्थितीत प्रदेशाध्यक्ष तानाजी जाधव यांनी दिली निवेदन आमदार अभिजीत पाटील यांनी उप-स्थित निराधारांना प्रश्नासाठी हिवाळी अधिवेशनात आवाज उठवण्याचे आश्वासन दिले

राज्यातील संजय गांधी निराध-ार योजनेतील लाभार्थ्यांसह इतर लाभार्थ्यांना दिव्यांग लाभार्थी प्रमाणे अनुदान वाढवून ते सरसकट अडीच हजार रुपये घेण्यात यावे. अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आले श्रावणबाळ माता-पिता सेवा सामाजिक संघटनेची राज्याध्यक्ष तानाजी जाधव यांच्या नेतृत्वाखाली पंढरपूरची तहसीलदार यांच्याकडे लेखी निवेदन दिले आहे.

केंद्र व राज्य शासनाकडून सुरू केलेल्या संजय गांधी निराधार योज-नेतील सर्व पात्र लाभार्थ्यांना दरमहा दीड हजार रुपये इतक्या अनुदान आज पर्यंत मिळण्यात येत होती पण दरमहा मिळणारे अनुदान हे आजच्या म हागाईच्या काळात आर्थिक खर्चाच्या बाबतीत बरीच मोठी तफावत दिसून येते.त्यामुळे त्यांना दरमहा बँकेकडे हेलपाटे मारण्यातच सर्व पैसे खर्ची पडत आहे त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ येत आहे शास-नाने राज्यातील संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांचा विचार करून दिनांक ३ सप्टेंबर २०२५ रोजी या मंत्रिमंडळ कॅबिनेट बैठकीत फक्त दिव्यांग लाभार्थ्यांना अनुदानात हजार रुपयाची वाढ झाल्याने, त्यांना आता मिळणारे एकूण अनुदान अडीच हजार रुपये इतकी वाढ केली आहे त्यामुळे राज्यातील दिव्यांगांना त्यांचा लाभ झाला आहे पण राज्यातील या योजनेतील निराधार शारीरिक आज-ाराने रोगग्रस्त व्यक्ती विधवा परितक्या देवदासी ६५ वर्षांवरील श्रावण बाळ सेवा युनिट यांना पात्र जाणून बुजून वाढीव अनुदानापासून शासनाने वंचित ठेवल्याने गंभीर आरोप श्रावणबाळ म ाता-पिता सेवा संघटनेची राज्याध्यक्ष तानाजी जाधव यांनी दिलेल्या



निवेदनात म्हटले आहे.

राज्यातील संजय गांधी निराधार योजनेतील दिव्यांग श्रावणबाळ सेवा इंदिरा गांधी राष्ट्रीय उद्धव काळ निवृत्ती वेतन योजना,इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना इत्यादी पाच योजनेचा मिळून संजय गांधी निराधार योजनेत विशेष सहाय्यता योजनेत समावेश करण्यात आलेला आहे.

परंतु शासनाने फक्त अपंग व दिव्यांग या एकच योजनेचा अनुदान वाढीसाठी प्रयत्न केला आहे त्यामुळे राहिलेल्या विविध पात्र योजने-तील लाभार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी पसरली असून उर्वरित राहिलेले लाभार्थ्यांची काय असा प्रश्न निर्माण होत आहे त्यामुळे या योजनेतील लाभार्थ्यांना दैनंदिन उपजीविकेसाठी देण्यात येणाऱ्या अनुदान कमी व अल्प असल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ येत आहे त्यांना महागाईच्या काळात अनेक समस्यांना तोंड द्यावी लागत आहे ६५ वर्षावरील श्रावण बाळ योजनेतील वृद्ध लाभार्थ्यांना मोल मजुरी अथवा कष्टाचे काम करता येत नाही अशा माता-पिता वृद्धांना श्रावणबाळ सेवा योज-नेचा लाभ देण्यात येतो तर विधवा महिला लाभार्थी कुटुंबातील मुलांचे संगोपन लहानपणापासून हे १८ वर्षे मोठी होईपर्यंत त्यांचे संगोपन केव्हा शिक्षणासाठी मतांच्या वारसा पत्नीस मोठी रक्कम खर्च करावी लागते त्या आल्यामुळे त्यांना अनेक आर्थिक संकटांना सामोरे जावे लागत आहे. दिव्यांग व इतर लाभार्थी ही संजय गांधी योजनेतील असल्याने त्यांनाही दिव्यांग प्रमाणे असल्याने श्रावणबाळ विधवा योजनेतील लाभार्थ्यांचा ही अनुदानात शासनाने हजार रुपये वाढ करून मिळणारे अनुदान हे अडीच हजार रुपये देण्याचा मायबाप सरकारकडे करीत आहे. तरी नागपूर येथील होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात राहिलेल्या गरजू लाभार्थ्यांच्या अन-ुदानात सरसकट अडीच हजार रुपये वाढ करून त्यांना दिलासा देण्यात यावा ही मागणी केली आहे.

या देण्यात आलेल्या निवेदनात प्रमुख मागण्या पुढील प्रमाणे शास-नाने दिव्यांग लाभार्थीप्रमाणे इतरही सर्व योजनेतील लाभार्थ्यांना सरसकट हजार रुपये ची वाढ करण्यात यावी व राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेतील नैसर्गिक किंवा अपघाती मृत्यू झाला असेल तर मताच्या वारसांना वीस हजार रुपये इतकी रक्कम देण्यात येते मात्र त्यासाठी मयताचे नाव दारिद्र रेषेखालील यादीत समाविष्ट करणे बंधनकारक ही रद्द करून मतीच्या रकमेत वाढ करून मताच्या वारसांना एक लाख रुपये देण्यात यावे.

श्रावणबाळ योजनेतील वृद्ध नागरिकांची वयाची अट ६५ वर्षे करून ६० वर्षे कमी करण्यात यावे शासनाने लाभार्थ्यांच्या २१००० रुपये उत्पन्नाची अट रद्द करण्यात देवांग प्रमाणे ५० हजार रुपये उत्पन्नाची अट करून ग्राम महसूल अधिकारी यांच्याकडून देण्यात येत उत्पन्नाचा दाखला ग्राह्य धरावा इत्यादी विविध म ागण्या निवेदनाद्वारे देण्यात आले आहे वरील सर्व मागणीची पूर्तता होणाऱ्या हिवाळी अधिवेशनाच्या काळात करण्यात यावी, राज्यातील संजय गांधी निराधार योजनेतील दिव्यांग सोडून वगळण्यात आलेल्या योज-नेतील लाभार्थ्यांच्या प्रश्नांची शास-नाने गंभीर देखील यावेळी मागणीची पूर्तता न केल्यास येणाऱ्या कार्तिक एकादशी दिवशी होणारी विठ्ठलाचे महापूजा राज्यातील संजय गांधी निराधार योजनेतील सर्व लाभार्थ्यांना बरोबर घेऊन मुख्यमंत्री व मंत्री यांच्या शुभहस्ते दोन नोव्हेंबर २०२५ रोजी ची विठ्ठलाची महापूजा रोखण्यात येईल याची संपूर्ण जबाबदारी प्रशासन राहील व इतर निवेदनाद्वारे दिला आहे हे पंढरपूर तालुकाध्यक्ष सुधाकर महानवर कार्याध्यक्ष हरिदास मुजमुले वारकरी संघटनेचे अध्यक्ष भानुदास बारडोली महाराज, अशोक शिखरे राजाराम जाधव, इत्यादी संघटनेची पदाधिकारी वृद्ध नागरिक महिला भगिनी संजय गांधी निराधार योज-नेतील लाभार्थी तहसील कार्यासम ोरच्या संख्येने उपस्थित मोठ्या प्रमाणे होते.

# बार्टीच्या कार्यप्रणालीचा अभ्यास करण्यासाठी राजस्थानच्या सामाजिक न्याय विभागाच्या अधिकाऱ्यांची भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने असलेली (बार्टी) पुणे ही संस्था देशातील महत्त्व-पूर्ण संस्था असून बार्टी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा सामाजिक समतेचा विचार तसेच भारतीय संविधानाचा प्रसार व प्रचार अतिशय योग्य रीतीने करत आहे. अनुसूचित जातीच्या उत्थानासाठी बार्टीने महत्वपूर्ण योगदान दिले असून बार्टीचे कार्य प्रेरणादायी आहे. बार्टीच्या विविध योजना व उपक्रमांच्या धर्तीवर राजस्थानच्या सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभागात कामकाज करून वंचित, उपेक्षित समूहांना न्याय देऊ असे प्रतिपादन राजस्थानच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे संचालक आशिष मोदी यांनी व्यक्त केले.

८ सप्टेंबर २०२५ रोजी अशिष मोदी यांनी बार्टी संस्थेला भेट दिली. प्रारंभी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस उपस्थित म ान्यवरांनी अभिवादन केले.या नंतर बार्टीचे महासंचालक सुनिल वारे यांच्या हस्ते त्यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा व महामानव हा ग्रंथ भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

त्यानंतर महासंचालक वारे यांनी बार्टीच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती दिली. यावेळी बार्टीमार्फत राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विकास, तसेच नागरी सेवा परीक्षा तसेच संशोधनाचे प्रकल्प याबाबत त्यांनी कौतुक केले. बार्टीचे अनेक विद्यार्थी भारतीय नागरी सेवेत व राज्यसेवेत कार्यरत असून कौशल्य क्षेत्रात प्रशिक्षण देऊन अनेक तरुणांना रोजगारा च्या संधी उपलब्ध



करून दिल्या असल्याचे महासंचालकांनी सांगितले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे ग्रंथ, पुस्तके हे इंग्रजी व मराठी भाषेत विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत ते हिंदी भाषेत राजस्थान सामाजिक न्याय विभागा मार्फत प्रसिद्ध करता येतील असा आशावाद राजस्थानच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. बार्टी राबवत असलेल्या विविध उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले. तसेच बार्टी व आंबेडकर पीठ राजस्थान यांच्यामध्ये एक सामंजस्य करार करण्याचे सूतोवाच त्यांनी केले.

याप्रसंगी निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, विभागप्रमुख श्रीमती स्नेहल भोसले, वषाली शिंदे, अनिल कारंडे, डॉ बबन जोगदंड, शुभांगी पाटील यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# पारधेवाडीच्या सरपंचपदी हनमंत जाधव यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
औसा प्रतिनिधी/अमर जाधव



औसा तालुका पारधेवाडी:- येथील ग्रामपंचायतीत सरपंच पद रिक्त झाल्यानंतर पदभार उपसरपंच हनुमंत जाधव यांच्या हातावर सोपवण्यात आला आहे. गावातील पद रिक्त झाल्यामुळे व प्रशासनिक कामकाज सुरळीत चालवण्यासाठी ही तात्पुरती जबाबदारी उपसरपंच यांना आज ९ सप्टेंबर २०२५ रोजी देण्यात आली आहे. पारधेवाडी गावातील अन्य कारणास्तव सरपंचपद रिक्त झालेले आहे. त्यामुळे शासनाच्या व पंचायत समितीच्या आदेशानुसार ग्रामपंचायत समितीने उपसरपंच हनुमंत जाधव यांना सरपंचपदाचे कार्य देखील पाहण्यास सांगितले आहे. ग्रामस्तरा-वर विकासकामांचे सुरळीत नियोजन आणि अंमलबजावणीसाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

उपसरपंच हनुमंत जाधव यांनी या जबाबदारीबाबत बोलताना सांगितले, ग्रामपंचायतीचे नेहमीप्रमाणे काम सुरळीत चालू राहावे म्हणून मी सदिच्छा आणि कमिटमेंटने हे पदभार स्वीकारत आहे. सर्व ग्रामस्थांच्या सहकार्याने गावाच्या विकासासाठी काम करू. यामुळे ग्रामविकासाच्या पुढील टप्प्याचे काम अजून गतिमान होण्याची अपेक्षा केली जात आहे. हा निर्णय ग्रामपंचायत व्यवस्थापनाच्या पारंपरिक नियमांनुसार व स्थानिक प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला असून, पुढील सरपंच पदाच्या निवडीपर्यंत हा उपाय म्हणून उपसरपंच हेच प्रभारी सरपंच म्हणून काम पाह-तील. याचा थेट परिणाम गावातील प्रशासकीय कामकाजावर होणार असून, ग्रामविकासाच्या कामात आणखी शिस्त आणि जबाबदारी वाढेल. पारधेवाडीमध्ये सध्या अनेक विकासकामे चालू असून, या काळात सरपंच पद रिक्त राहिल्याने शासनाच्या विविध योजना आणि प्रकल्पांसाठी आवश्यक निर्णय घेणे कठीण झाले असते. हनुमंत जाधव यांच्या नेतृत्वाखाली हे काम पुन्हा सुरळीत होईल असा विश्वास ग्रामस्थांना आहे.

# नागनाथ बिराजदार यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट /प्रतिनिधी : हालहळ्ळी (अ) (ता. अक्कलकोट) येथील माजी सरपंच नागनाथ भिमशा बिराजदार ( वय - ७३ ) यांचे स्वतःच्या शेतात उडीद रास करताना पिण्यासाठी पाणी शेजारील शेतातील शेततळ्यातून पाणी आणायला गेल्यावर पाय घसरून पडल्याने पाण्यात बुडून निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सुना, चार भाऊ, तीन बहिणी,

नातवंडे असा परिवार आहे.त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.माजी सरपंच कै.नागनाथ बिराजदार हे गरीब कुटुंबातील जन्मलेल्या व्यक्ती होते.ते लहान मोठ्यांनबरोबर मिळून मिसळून राहणारा अंत्यंत हळव्या मनाचा व निगर्वी व्यक्तिमत्त्व होते.ते हाल-हळ्ळी (अ) गावचे सलग पंधरा वर्षे सरपंच पद भुषविले होते.त्यांच्या सरपंच पदाच्या कार्यकाळात गरिबी परिस्थितीचे जाणीव ठेवून गोरगरिबांच्या अडी अडचणी सोडविले होते.ते भिमराया ( पिंटू) बिराजदार यांचे वडील होत तर दैनिक सुराज्यचे पत्रकार रविकांत धनशेट्टी यांचे ते सख्खा मामा होते.माजी सरपंच कै. नागनाथ भिमशा बिराजदार यांचे अच-ानक पणे निधन झाल्याने हालहळ्ळी (अ) गावात हळहळ व्यक्त होत असून, परिसरात शोककळा पसरली आहे.

# माढ्यातील नेत्र शिबिरात ३६४ जणांची मोफत तपासणी, १०५ रुग्णाची होणार मोतीबिंदू शस्त्रक्रिया

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मोबाईलच्या अतिरेकी वापरामुळे डोळ्याचे विविध विकार व व्याधी वाढल्या आहेत. अनेकांची दृष्टी केली आहे तर काहींची क्षीण होत चालली आहे. यावर उपाययोजना करण्याच्या उद्देशाने ८० सम ाजकारण व २० टक्के राजकारण करणारी माजी आमदार पवनराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मागील सोळा वर्षापासून नेत्र शिबिरात २४ हजारहून अधिक जणांची मोफत तपासणी व सात हजार ७०० हून अधिक पोरांच्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केल्या आहेत बबन दादाच्या पुढाकाराने हजारो नेत्र रुग्णांना नव्याने दृष्टी मिळालेले असे प्रतिपादन डॉक्टर एकनाथ शेळके यांनी केले आहे.

ते माढा येथील कर्मयोगी आमदार बबनराव शिंदे नेत्रालय संतोष संकल्प फाउंडेशन व माढेश्वरी अर्बन बँक सांस्कृतिक मंडळाच्या वतीने बँकेचे चेअरमन माजी आमदार बबनराव शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित मोफत नेत्र चिकित्सा व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्धाटनाच्या वेळी बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना व्हाईस चेअरमन विक्रम शिवम शिंदे यांनी सांगितले की लवकरात लवकर माढा म तदारसंघातील गोरगरीब व गरजू रुग्णांच्या सेवेसाठी माढा येथे सुसज्ज व अद्यावत असे सर्व सुविधांनी युक्त हॉस्पिटल सुरू करण्याचा मानस आहे बबन दादाच्या वाढदिवसानिमित्त




गावोगावी रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, शैक्षणिक साहित्याचे वाटप, बौद्धिक व्याख्यानमाला व मोफत नेत्र तपास, आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आधी सामाजिक उपक्रमाच्या माध्यम ातून साजरा केल्याचे त्यांनी सांगितले आहे.

यावेळी नेतृत्व डॉक्टर श्रीधर कुलकर्णी , नेत्र चिकित्सक डॉक्टर गणेश इंदुरकर, वैद्यकीय अधिकारी डॉक्टर सुयोग बुरगुटे, मार्केट कमिटीचे उपसभापती सुहास पाटील, माजी जिल्हा परिषदेचे झुंजार भांगे, सहाय्यक पोलीस नेताजी बंडगर, संचालक गणेश काशीद दिगंबर गवळी, पांडुरंग घाडगे, मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रेय मुळे, सचिव निलेश कुलकर्णी सज्जनराव जाधव, नगरसेवक राजू गोटे, बाळासाहेब चव्हाण, धनंजय शहाणे अनिकेत चौरे, औदुंबर चौरे दिनेश गाडेकर, यांच्यासह ग्रामस्थ माढेश्वरी बँकेची कर्मचारी, नेत्र रुग्ण व त्यांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन आदर्श शिक्षक राजेंद्र गुंडे यांनी केली तर आभार मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रेय मुळे यांनी केले.

**सोलापूर आयटी हबच्या दिशेने**

**सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनचा ३०वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात**

# आयटी उद्योगांसाठी सोलापूर सज्ज; सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनकडून ठाम आश्वासन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) : सोला-पूर इंडस्ट्रीज असोसिएशनची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा व वर्धापन दिन सोहळा दिनांक ९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता जयकुमारजी पाटील उद्योग भवन, चिंचोळी एम.आय.डी.सी येथे उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला नवीन सभासद हॉटेल रिजेंटा, अलिवस लाईफ सायन्सेस लि, पी आर पो-लीमर्स इंडिया, आर एम इंटरप्रायझेस, श्री स्वामी समर्थ फॅब्रिकेशन, तसेच शासकीय अधिकारी एम.आय.डी. सी. चे प्रादेशिक अधिकारी श्री. शिवाजी राठोड, उपअभियंता श्री. प्रदीप खंदारे, फायर ब्रिगेड अधिकारी श्री. दिनेश अंभोरे, प्रभारी वैद्यकीय अधिकारी महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी श्री मिलिंद चौधरी यांचे स्वागत करण्यात आले.

त्यानंतर टाटा पॉवर सोलर चे विभागीय सेल्स मॅनेजर सौ. मीनल मीमानी यांनी उपस्थित सभासदांना सौर ऊर्जा बसविण्याचे फायदे, शासन धोरणे आणि भविष्यातील ऊर्जा गरज याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर वर्कफोर्स सेंटर प्रा. लि. यांनी त्यांच्या सेवा आणि पलराम इंडिया प्रा. लि. यांनी त्यांच्या उत्पादनांची माहिती दिली.

असोसिएशनचे खजिनदार श्री. सप्रेम कोठारी यांनी वार्षिक हिशोबांचे सादरीकरण केले. तसेच असोसिएशनचे कामकाज पाहण्यासाठी चार्टर्ड अकाऊंटंट श्री. धनराज नो-गजा यांची २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी नेमणूक सर्वानुमते मंजूर करण्यात आली. नवीन इमारतीसाठी देणगी देणाऱ्या सभासदांचेही त्यांनी मनः पूर्वक आभार मानले.

असोसिएशनचे सचिव श्री. वासुदेव बंग यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करताना गेल्या वर्षभरातील कामांचा आढावा घेतला व आजपर्यंतच्या ३० वर्षांच्या प्रवासाचा आढावा




उपस्थितांसमोर ठेवला. तसेच असोसिएशनच्या नव्या इमारतीसाठी सभासदांनी पुढाकार घेण्याचे आव-ाहन केले.

अध्यक्षीय भाषणात अध्यक्ष श्री. डी. राम रेड्डी यांनी आगामी काळात असोसिएशनमार्फत हाती घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तसेच सभासदांना सेमिनार, प्रशिक्षण कार्यशाळा व मिटिंग्समध्ये सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आ-वाहन केले. सभासदांनी आपल्या अडीअडचणी निर्भीडपणे मांडाव्यात व कोणत्याही अनधिकृत कृतींना दूर ठेवावे, असे आवाहनही त्यांनी केले. त्याचबरोबर सोल-ापुरात येणाऱ्या आयटी उद्योगांना असोसिएशनकडून पूर्ण पाठिंबा देण्यात येईल असे ठाम आश्वासनही त्यांनी दिले. सभासदांकडून मि ळणाऱ्या सहकार्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले.

या कार्यक्रमाला अध्यक्ष श्री. डी. राम रेड्डी, उपाध्यक्ष श्री. गणेश सुत्रावे, सचिव श्री. वासुदेव बंग, खजिनदार श्री. सप्रेम कोठारी, सहसचिव श्री. अभिषेक तापडिया, श्री. शिवशंकर आंधळकर, माजी अध्यक्ष व कार्यकारी सदस्य श्री. शरदकृष्ण ठाकरे, कार्यकारी सदस्य श्री. कमलेश शहा, सौ. रामेश्वरी गायकवाड, श्री. तारासिंग राठोड, श्री. जयपाल महिंद्रकर, श्री. विक्रम बंडेवार यांच्यासह मोठ्या संख्येने उद्योजक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सभासद तेजस्विनी तापडिया आणि संस्थेचे मॅनेजर श्री. शुद्धोधन गायकवाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. अभिषेक तापडिया यांनी मानले.

# बुद्धगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनासाठी सर्व पक्ष संघटनांची मुंबईत आज बैठक

## महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनासाठी बौद्धांची एकजूट उभारण्याचा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचा प्रयत्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बुद्धाया येथील महाबोधी महाविहार हे बौद्धांचे जागतिक सर्वोच्च श्रद्धास्थ-ान आहे.तरीही हे श्रद्धास्थान बौद्धांच्या ताब्यात नाही हा मोठा अन्याय आहे.त्याविरुद्ध देशात आंदोलन केले जात आहे.बुद्धगया येथील महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला महाराष्ट्रातून ताकद देण्याची गरज आहे.मुंबईत आणि म हाराष्ट्रात सर्व बौद्ध समाजाच्या एकजुटीतून. महाबोधी महाविहार मुक्तीचे मुंबईत विराट आंदोलन उभारण्याची गरज आहे.त्यासाठी सर्व बौद्ध समाजाच्या विविध राजकीय पक्ष गट आणि धार्मिक संघटनांची एकजूट उभारणे गरजेचे आहे.त्यासाठी येत्या १० सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजता मुंबईत सांताक्रुझ पूर्व कालिना विद्या-पीठ कॅम्पस समोर भीम छाया सांस्कृतिक केंद्र येथे सर्व बौद्ध समाजाच्या राजकीय नेत्यांची धार्मिक संघटनांची एकत्रित महत्वपूर्ण बैठक महाबोधी म हाविहार मुक्ती आंदोलनासाठी आयोजित करण्यात आली आहे.या बैठकीचे निमंत्रण केंद्रीय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी सर्व रिपब्लिकन गटांच्या नेत्यांना संघटनांना आणि धार्मिक संघटनांना पाठवले आहे.. अशी माहिती आज पत्रकार परिषदेत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश म हातेकर राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे आणि रिपाइं चे सचिव सुरेश बार्शिंग यानी मुंबई मराठी पत्रकार संघात दिली.

बुद्धगया येथील महाबोधी महाविहार मुक्ती साठी मुंबईत आणि संपूर्ण महाराष्ट्रात सकल बौद्धांच्या एकजुटीचे आंदोलन उभारणे गरजेचे आहे त्यासाठी सर्व राजकीय मतभेद बाजूला सारून निष्पक्षपणे महाबोधी म हाविहार मुक्ती आंदोलन उभारले पाहिजे.

या एकजुटीच्या आंदोलनाच्या बैठकीचे निमंत्रण वरिष्ठ नेते ॲड.प्रकाश आंबेडकर ; प्रा.जोगेंद्र कवाडे;भीमराव आंबेडकर आनंदराज आंबेडकर; डॉ राजेंद्र गवई; नाना इंदिसे; अर्जुन डांगळे ; जयदेव गायकवाड ;दिलीप जगताप; राजरत्न आंबेडकर; खा.चंद्रकांत हंडोरे; चंद्रबोधी पाटील; गगन मलिक; ज वी पवार; कुणाल बबन कांबळे; विलास गजघाटे ; कनिष्क कांबळे; अनिकेत संसारे; व्ही एस मोकळे; सुनील उर्फ भाऊ निर्भावने; सागर संसारे; तानसेन ननावरे ;भाई गिरकर; सुरेश माने; खा. वर्षाताई गायकवाड; संजय बनसोडे; राम पंडागळे; नितीन मोरे; सुरेश केदारे; रवी गरुड; नागसेन कांबळे तसेच बौद्ध धर्मगुरू भदंत सुरई सुस-ई; भदंत राहुल बोधी महाथेरो ; भदंत विरत्न तसेच महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाचे आकाश लामा; भदंत विनाचार्य आदींना या बैठकीला निमंत्रित करण्यात आले आहे.

महाबोधी महाविहार हे बौद्धांचे श्रद्धास्थान आहे त्यावर पूर्णपणे बौद्धांचाच अधिकार आहे.हिंदू मंदिरांवर हिंदूंची ट्रस्ट ; मुस्लिम मशिदीवर मुस्लिमांची ट्रस्ट ख्रिस्ती धर्माच्या चर्चवर ख्रिस्ती धर्मियांची ट्रस्ट असते तसेच महाबोधी महाविहार हे बौद्धांचे असून त्यावर बौद्धांची ट्रस्ट विश्वस्त संस्था असली पाहिजे. महाबोधी महाविहार च्या ट्रस्ट बाबत झालेला कायदा भारतीय संविधान लागू होण्याच्या आधीचा कायदा आहे.

१९४९ चा बी टी ॲक्ट रद्द झाला पाहिजे.त्या कायद्यात दुरुस्ती करून महाबोधी म हाविहार च्या ट्रस्ट मध्ये सर्व सदस्य बौद्ध असले पाहिजेत; सर्व ट्रस्टी बौद्ध असावेत आणि चेअरमन सुद्धा बौद्ध असला पाहिजे.

या ट्रस्ट मध्ये काही ट्रस्टी हिंदू आल्यामुळे बुद्ध गया येथील महाबोधी महाविहार परिसरात कर्मकांड पिंडदान केले जाते ते प्रकार महाबोधी महाविहार परिसरात करू नयेत.

महाकारुणी भगवान बुद्धांच्या विचाराविरुद्ध कर्मकांडाचे पिंडदानाचे प्रकार महाबोधी महाविहार परिसरात होता कामा नये आदी मागण्यांसाठी संपूर्ण बौद्ध समाजाचे मुंबईत विराट आंदोलन उभारण्यासाठी सर्व बौद्ध आंबेडकरी संघटना राजकीय पक्ष रिपब्लिकन चे सर्व गट सर्व बौद्ध धम्मीय संस्था संघटनांची सर्वसमावेशक बैठक येत्या १० सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजता मुंबईत भीमछाया सांस्कृतिक केंद्र कालिना संताक्रुझ पूर्व येथे आयोजित करण्यात आल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

---



# अनंत चैतन्य प्रशालेत स्वयंशासन दिवस आनंदमय वातावरणात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : आपल्या अगाध बुद्धीमत्ता व सार्वजनिक जीवनात दिलेल्या योगदानामुळे शिक्षक, प्राध्यापक, तत्वज्ञ पद-ापासून ते देशाच्या सर्वोच्च अशा राष्ट्रपतीपदापर्यंत मजल मारलेल्या समस्त शिक्षकांकरिता अभिमानास्पद व प्रेरणास्रोत असलेल्या डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा ५ सप्टेंबर हा जन्म दिवस सर्वत्र शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो याच अनुषंगाने महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्य. व कनिष्ठ महाविद्यालय हन्नूर येथेही

शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सोबतच विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी, त्यांना प्रशास-नाचा अनुभव देण्याबरोबरच विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांच्यातील सुसंवादयुक्त जबाबदारीची जाणीव विद्यार्थ्यांना व्हावे यासाठी नवोपक्रमाचा एक भाग म्हणून प्रशालेच्यावतीने याच दिवशी प्रतिवर्षी

स्वयंशासन दिवसाचेही आयोजन करण्यात येते.या दिवशी विद्यार्थी मुख्याध्यापक, पर्यवेक्षक , शिक्षक, लिपिक व सेवक यासारख्या भुमिका निभावतात. यंदाही इ. नववी तु. अ मध्ये प्रथम आलेली व दहावीत शिकणारी विद्यार्थिनी कु. श्रावणी हताळे हिला मुख्याध्यापिका तर ब मध्ये प्रथम आलेली विद्यार्थिनी कु. सिरीन हीस पर्यवेक्षिका होण्याचा मान मिळाला. व याच वर्गातील कुमार रमेश चव्हाण हा सेवक कर्मचाऱ्याची भुमिका खुबीने निभावले. तर २० हून अधिक विद्यार्थी - विद्यार्थिनिनीं दिवसाच्या पहिल्या सत्रातील परिपाठापासून इ. ५ वी ते ९ वी पर्यंतच्या वर्गातील विद्यार्थ्यांना तयारीनिशी अध्यापन करुन शिक्षक - शिक्षिकाची जबाबदारी व्यवस्थितरित्या पार पाडली.व विषय शिक्षकांना घ्याव्या लागणाऱ्या कष्टाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

**दहावीच्या विद्यार्थ्यांनी घेतला प्रशासन व अध्यापनाचा अनुभव**

दुपारच्या सत्रात ज्ञानेश्वर बनसोडे, राजरत्न सोनकांबळे या विद्यार्थ्यांनी दिवसभरात आलेले अनुभव आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

या दुसऱ्या सत्रातील कार्यक्रम ापुर्वी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे व पर्यवेक्षक श्री. ज्ञानदेव शिंदे यांच्या हस्ते भारताचे दुसरे राष्ट्रपती भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. आदरणीय पंचप्पा कल्याणशेट्टी सरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर दहावी विद्यार्थ्यांवतीने प्रशालेचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक,शिक्षक - शिक्षिका यांचे गुलाबपुष्प व पेन देऊन सन्मान करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुमार योगीराज पवार यांने , सुत्रसंचालन कु. अमरीन पठाण हिने केले तर आभार कु. आर्शिया सिंदखेडे हिने मानले.

शिक्षक व स्वयंशासन दिवस यशस्वीपणे संप्पन करण्यासाठी धनंजय जोजन,अप्पासाहेब काळे, सुरेश जाधव, सरदार मत्तेखाने, मृदुलादेवी स्वामी, मल्लम्मा चपळगाव यांनी उत्तम नियोजन केले. शालेय जीवनातील अविस्मरणीय अशा विद्यार्थी स्वयंशासन दिवसाच्या उपक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष व आमदार मा. श्री. सचिनदादा कल्याणशेट्टी, संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक मा. श्री. मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारस्तंभ श्री. सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, संस्थेच्या संचालिका मा. सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी, हन्नूरचे उपसरपंच व युवा नेते मा. श्री. सागरदादा कल्याणशेट्टी, संचालक श्री. मल्लिकार्जुन मसुती, सी. ई. ओ. सौ. रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ. पुनम कोकळगी यांनी कौतुक केले.

---

# निफाड न्यायालयाचा महत्वाचा निर्णय; आरोपीला बेकायदेशीर अटकेतून दिलासा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी :

निफाड येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने दि. ८ सप्टेंबर २०२५ रोजी एक महत्वाचा व कायदेशीर निर्णय देत बेकायदेशीर अटकेला आळा घातला आहे. पिंपळगाव पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्हा रजिस्टर नंबर २३९/२०२५ अन्वये भारतीय नागरीक संहिता कलम १३७(२), ६४(१), ६५(१) तसेच बालकांचे संरक्षण कायदा अधिनियम २०१२ (पॉक्सो) अंतर्गत कलम ४ व ८ या गंभीर कलमानुसार आरोपी राकेश अनिल कडाळ यास पोलिसांनी अटक करून न्यायालयासमोर हजर केले होते.

मात्र सुनावणीदरम्यान आरोपीच्या अटकेमागील कारणे व पुरावे हे कायदेशीर दृष्ट्या अपुरे असल्याचे स्पष्ट होताच न्यायालयाने आरोपीस तात्काळ सोडून देण्याचा आदेश दिला. न्यायालयाने आपल्या निर्णयात स्पष्ट नमूद केले की, या अटकेदरम्यान भारतीय संविधानातील कलम २१ (व्यक्तिस स्वातंत्र्य) व कलम २२ (अटकेदरम्यान हक्कांचे संरक्षण) या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन झाले आहे.

**बेकायदेशीर अटकेला न्यायालयाची लगाम**

या खटल्यात आरोपीची बाजू प्रभावीपणे मांडताना निफाड येथील ड. स्वराज सुनिल कुंदे यांनी महत्वाची भूमिका बजावली. त्यांनी न्यायालयात सविस्तर युक्तिवाद करत अटकेची बेकायदेशीरता पटवून दिली. यावेळी सर्वोच्च न्यायालयातील नुकताच दिलेला विहान कुमार विरुद्ध हरियाणा सरकार, २०२५ या खटल्यातील निर्णयाचा दाखला देत आरोपीच्या बाजूला भक्कम कायदेशीर आधार दिला. न्यायालयाने सर्व बाबींचा विचार करून आरोपी राकेश अनिल कडाळ यास तातडीने सोडण्याचा आदेश दिला. या निर्णयामुळे कायद्याचे काटेकोर पालन आणि व्यक्तीगत हक्कांच्या रक्षणाचा पुन्हा एकदा ठळक पुरावा मिळाल्याचे विधी तज्ज्ञांचे मत आहे.

---

# तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धेत प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलचा संघ प्रथम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी :

उमरगा तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धेत चौदा वर्ष वयोगटात प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलच्या क्रिकेट संघाने तालुक्यातून प्रथम विजेतेपद पटकाविल्याबद्दल माजी राज्यमंत्री बसवराज पाटील, जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापुराव पाटील, उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील, नगर शिक्षण विकास मंडळाचे सचिव व्यंकटराव जाधव गुरुजी आदींनी त्यांचे कौतुक केले. या संघाने अंतिम लढतीत फलंदाजी व गोलंदाजीच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघाचा पराभव करून विजेतेपद मिळवून जिल्हास्-तरीय स्पर्धेसाठी या खेळाडूंची निवड झाली.



यावेळी उमरगा तालुका क्रीडा सचिव राजेंद्र सोलंकर, सुजित शेळके, नारायण सोलंकर, जयसिंग राठोड उपस्थित होते. या विजेत्या संघामध्ये कर्णधार मयुरेश कांबळे, आदर्श मेणसे, तहलिल लोणी, विराट राजपूत, नालसाब बागवान, आणप्पा बन्ने, गौरव सरसंबे, गणेश बिराजदार, रोशनअली सुलेपेठ, आर्यन गुरव, रितेश गायकवाड, कुणाल सागर आदींचा सहभाग होता.

या खेळाडूंना शिक्षक सागर मंडले यांचे मार्गदर्शन लाभले. या यशस्वी खेळाडूंचा सत्कार मंगळव-ार (ता. ९ ) रोजी सच्चिदानंद अंबर, डॉ. पुरुषोत्तम बारवकर, मुख्याध्यापिका अनुराधा जोशी, धनराज हळळे, संगमेश्वर लामजने यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विरेंद्र लोखंडे, सुभाष धुमाळ, पंकज पाताळे, नेहा माने, शितल घोडके, अश्विनी क्षीरसागर, सोनाली कारभारी, तनुजा जमादार, प्रभावती कलशेट्टी, साधना शेवाळकर, गीता सत्रे, सरस्वती जाधव, सरोजा सारणे, सुधाराणी पाटील, श्रीद-ेवी मंडले, पुजा मरबे, इंदिरा व्हट्टे, साक्षी देशमाने, जास्मिन मुल्ला आद-ींनी त्यांचे विशेष अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार जगदीश सुरवसे यांनी मानले.

---

## लोकधारा प्रतिष्ठानची ठाणे जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

# पडघा आरोग्य केंद्रातील उपकेंद्रे बंद; ग्रामीण जनतेच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भिवंडी तालुक्यातील ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांच्या आरोग्यसेवेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. शासनाने लाखो रुपये खर्च करून बांधलेली पडघा प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत येणारी खालिंग, डोहोळे, वडवली, तळवली ,आमणे ही पाच उपकेंद्रे बंद अवस्-थेत पडली असून, नागरिकांना उपचारासाठी खा-जगी दवाखान्यांकडे धाव घ्यावी लागत आहे. यामुळे गोरगरीब आणि शेतकरी वर्ग आर्थिकदृष्ट्या त्रस्त झाला आहे. म्हणून या गंभीर परिस्थितीवर लोकधारा प्रतिष्ठानने आ-वाज उठवला आहे. उपकेंद्रात डॉक्टर ,कर्मचारी नियमित हजर राहण्याबाबत लोकधारा प्रतिष्ठान संस्थेचे अध्यक्ष मिलिंद जाधव यांनी ठाणे जिल्हा आरोग्य अधिकारी, भिवंडी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व भिवंडी तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकडे निवेदन सादर केले आहे.

**प्रत्येक उपकेंद्रावर प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली असता ती बंद अवस्थेत असल्याचे दिसून आले. आरोग्य सेवेतील हा निष्काळजीपणा असून, तात्काळ डॉक्टर, नर्स, आरोग्य सेविका, सफाई कर्मचारी व आशा स्वयंसेविका उपकेंद्रावर नियमित हजर राहणे बंधनकारक केले पाहिजे. अन्यथा ग्रामीण जनतेच्या आरोग्याचा प्रश्न अधिक गंभीर होईल**

**- मिलिंद जाधव (लोकधारा प्रतिष्ठान अध्यक्ष)**

आरोग्य उपकेंद्रे ही ग्रामीण आणि दुर्गम भागा-तील नागरिकांना प्राथमिक आरोग्य सेवा घरपोच पोहोचविण्यासाठी स्थापन केली जा-तात. प्रत्येक गा-वातील नागरिकांना लहानसहान आजारांपासून ते लसीकरण, गर्भवती स्त्रियांची काळजी, बालकांचे आरोग्य तपासणी, क्षयरोग नियंत्रण, स्वच्छता अभियान यांसारख्या अनेक सेवा उपकेंद्रांतून पुरवल्या




जातात. परंतु पडघा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अंतर्गत येणाऱ्या सहा उपकेंद्रांपैकी पाच उपकेंद्रात कर्मचारी नसल्यामुळे अक्षरशः शोभेची बाहुली ठरली आहेत. दरवर्षी शासनाकडून हजारो कोटी रुपये सामान्य जनतेच्या आरोग्यासाठी खर्च केले जातात. डॉक्टर, नर्स व इतर कर्मचारी नेमले जातात. परंतु त्यांची उप-स्थिती प्रत्यक्ष उपकेंद्रावर दिसत नाही. त्यामुळे गावोगावी उपकेंद्रे बंद असून, नागरिकांना अपेक्षित सुविधा मिळत नाहीत. त्यामुळे लोकांच्या मनात प्रश्न उपस्थित होत आहे की शासनाचे आरोग्य बजेट खरोखरच नागरिकांपर्यंत पोहोचते का? की ते केवळ कागदोपत्रीच राहते?

पडघा आरोग्य केंद्राच्या अखत्यारितील सहा उपकेंद्रांपैकी पाच उपकेंद्रांतच सुमारे ४२,२६९ लोकसंख्या असून, त्यांच्यासह आजूबाजूच्या वाड्या-वस्त्यांवर या सेवांची जबाबदारी आहे. पावसाळ्यात पाण्याचे प्रदूषण, डेंग्यू-मलेरिया, पोटाचे आजार, सर्पदंश यांसारखे धोके वाढतात. अशावेळी गावाजवळील उपकेंद्र बंद राहिल्याने रुग्णांना शहरात किंवा खाजगी दवाखान्यांत जावे लागते. यात वेळ, पैसा आणि जीव दोन्ही धोक्यात येतात. पडघा आरोग्य केंद्राच्या अंतर्गत पाच उपकेंद्रांची अवस्था अशीच राहणार की, ती नागरिकांच्या सेवेसाठी प्रत्यक्ष सुरू केली जाणार, याकडे तालुका व जिल्हा आरोग्य विभागाचे लक्ष लागले आहे. ग्रामीण जनतेचा जीव वाचवण्यासाठी तातडीने उपाययोजना होणे अत्यावश्यक आहे. तसेच यासंदर्भात भिवंडी तालुका आरोग्य अधिकारी नलिनी ठोंबरे यांच्याशी संपर्क केला असता संपर्क होऊ शकला नाही.

**राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत काही नर्स संपावर आहेत. तळवली उपकेंद्राचे सी.एच.ओ. संपावर आहेत. तळवली, डोहोळे व आमणे येथील सिस्टरना पडघा आरोग्य केंद्रात ओपीडी व लसीकरणाची ड्युटी लावण्यात आली आहे. खालिंग येथील सिस्टर तीन महिन्यांच्या प्रशिक्षणावर असून वडवली उपकेंद्रातील सिस्टरही संपावर आहेत.**

**- डॉ. प्रज्ञेश पाटील (पडघा वैद्यकीय अधिकारी)**